# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 11 June 2025

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ११ जून २०२५ दुपारी १.०० वा.

****

भावी पिढीसाठी पायाभूत सुविधा निर्माण करण्याचे भारताचे प्रयत्न सातत्यपूर्ण दूरदृष्टी ठेवून प्रेरित असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. या प्रयत्नांमुळे आत्मनिर्भर भारताचा पाया रचला गेला असल्याचं पंतप्रधानांनी आपल्या सामाजिक प्रसार माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. पायाभूत सुविधांमधील क्रांतीला आता ११ वर्ष पूर्ण झाली आहेत. या कालावधीत देशभरात उत्तम पायाभूत सुविधांची निर्मिती आपल्या सरकारनं केली असल्याचं पंतप्रधानांनी म्हटलं आहे.

****

भारत सरकार इटालियन कंपन्यांसाठी “होम अवे फ्रॉम होम” या संकल्पनेवर आधारित समर्पित औद्योगिक वसाहती विकसित करणार आहे. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी इटली दौऱ्यादरम्यान ही माहिती दिली. राज्यात या वसाहतींसाठी मुंबईजवळील दिघी आणि छत्रपती संभाजीनगर इथल्या ऑरिक सिटीची निवड करण्यात आली आहे. छत्रपती संभाजीनगरमधील ऑरिक सिटीचा विस्तार सुमारे आठ हजार एकरांपर्यंत करण्याचा प्रस्ताव सकरारने तयार केला असून, या विस्तारीकरणात इटालियन कंपन्यांसाठी स्वतंत्र क्लस्टरची रचना केली जाणार आहे. या वसाहतीत इटालियन कर्मचाऱ्यांसाठी आवश्यक सर्व सुविधा दिल्या जाणार असून, यामध्ये इटालियन अभ्यासक्रमावर आधारित शाळा तसंच महाविद्यालयं, इटलीतील आरोग्य विमा योजनांना स्वीकारणारी हॉस्पिटल्स, तसंच एकत्रितपणे काम आणि निवास आदी सुविधांचा समावेश असेल. इथे होणाऱ्या गुंतवणुकीमुळे स्थानिकांना रोजगाराच्या संधी मिळतील तसंच पायाभूत सुविधा अधिक विकसित होतील, असा विश्वास वर्तवला जात आहे.

****

शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफीचा निर्णय, दिव्यांगाना सहा हजार रुपये दर महिन्याला मानधन आणि इतर १७ मागण्यांसाठी अमरावती इथे अन्नत्याग आंदोलन करत असलेले माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांची प्रकृती खालावली आहे. बच्चू कडू यांच्या आंदोलनाचा आज चौथा दिवस आहे. दरम्यान या आंदोलनाकडे सरकार दुर्लक्ष करत असल्याने अमरावती जिल्ह्यातील आसेगावचे शेतकरी आज आक्रमक होत एका टॉवरवर चढले. या आंदोलनाची दखल घेतली जात नाही तोपर्यंत टॉवरवरून खाली न उतरण्याचा इशारा देखील या शेतकऱ्यांनी दिला आहे.

****

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या अनुषंगाने प्रशासकीय प्रक्रियांना वेग आला असून राज्य सरकारने काल महापालिका, नगरपालिका आणि नगरपंचायतींना प्रभागरचना करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार अ, ब आणि क वर्क महापालिकांची प्रभागरचना होणार आहे. यात छत्रपती संभाजीनगरसह पुणे, नागपूर, ठाणे, नाशिक, पिंपरी चिंचवड, नवी मुंबई, वसई विरार आणि कल्याण डोंबिवलीसारख्या महापालिकांचा समावेश आहे. राज्यात ४ वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्या आहेत. निवडणुका घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिल्यानंतर आता त्यासंबंधी हालचाली सुरू करण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्रातील महापालिकांची प्रभाग रचना करण्याबाबतचे आदेश जारी करण्यात आल्यानंतर मुंबईमध्ये जुन्याच प्रभागानुसार निवडणुका होणार असल्याचं स्पष्ट झालं आहे तर छत्रपती संभाजीनगर, पुणे, नागपूर, ठाणे, नाशिक, नवीमुंबई, पिंपरी चिंचवडसह यासह इतर सर्व महापालिकांमध्ये ४ सदस्यांचे प्रभाग असणार आहेत.

****

राज्यामध्ये लवकरच शाळांच्या घंटा वाजणार आहेत. उन्हाळी सुट्ट्या संपत आल्या असून महाराष्ट्र राज्य बोर्डाच्या शाळा १६ जूनपासून सुरू होणार आहेत. राज्यातील ११ जिल्हे वगळता सगळीकडे शाळा १६ जूनपासून सुरू होणार आहेत. विदर्भामध्ये इतर विभागांच्या तुलनेत थोड्या उशिराने शाळा सुरू केल्या जातात. शाळांचे वेळापत्रकात बदल करण्यात आला आहे. आता शाळा सकाळी सात ऐवजी ९ वाजता सुरू होणार आहेत.

****

सोलापूर जिल्ह्यातल्या करमाळा तालुक्याचे माजी आमदार जयवंत जगताप यांनी मुंबईत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत प्रवेश केला. यावेळी सांगोल्याचे माजी आमदार शहाजी पाटील, बुलडाणा जिल्ह्यातील

सिंदखेडराजाचे माजी आमदार डॉ. शशिकांत खेडकर यांची प्रमुख उपस्थिती होती. जयवंत जगताप यांच्या शिवसेना प्रवेशामुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत शिवसेनेला मोठा लाभ होण्याची शक्यता आहे.

****

लातूर जिल्ह्यात सोयाबीन आणि इतर शेतमालाच्या सुरक्षित साठवणुकीसाठी महाराष्ट्र राज्य वखार महामंडळामार्फत 'सोयाबीन साठवणूक क्लस्टर' विकसित करण्यात येत आहे. यात लातूर औद्योगिक वसाहतीत दहा हजार मेट्रिक टन क्षमतेचा सायलो प्रकल्प आणि अत्याधुनिक गोदाम, पानगाव इथे तीन हजार मेट्रिक टन क्षमतेचं नवीन वखार केंद्र असेल. नियोजित सायलो प्रकल्पाचा मुख्यमंत्र्यांच्या १०० दिवस कृती आराखड्यात समावेश आहे.

****